# काव्यकुंज



## आली दिवाळी!

आली दिवाळी आली दिवाळी
करुया दिवाळी साजरी आनंदात
लावून दारी दिवे पसरवू सर्वदूर प्रकाश
आली दिवाळी आली दिवाळी
घरोघरी झाला तयार फराळ
त्यात होते चिवडा,चकली,लाडू
देवून फराळ शेजारी,करुन घेवूया
त्यांनाही आपल्या आनंदात सहभागी
हया आनंदात मात्र ठेवा एका गोष्टीकडे लक्ष
नका होवू देवू पर्यावरणच भक्ष्य
नका फोडू फटाके,नका करु प्रदुषण
बोलून प्रेमाचे दोन शब्द,लावून दिवे दारी
करुया साजरी खरी दिवाळी
शुभ दिपावली! शुभ दिपावली!




**विलास आनंदा चव्हाण**
कारागिर -ब
भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र


## भेदभाव

सर्व मानवाची जात एकच आहे जगात ।
हा भेदभाव तुम्ही करु नका आपसात ।।

हिंदू, बौध्द, इस्लाम असे हे धर्म अनेक
अभ्यास करुन पाहा सर्वांचा ईश्वर एक
धर्माच्या नावावरती भांडण नको जनात
हा भेदभाव तुम्ही करु नका आपसात ।।

हा जातीवाद कशाला, तुम्ही सर्व एक समान
आपला असो की परका, करा सर्वांचा सम्मान
सर्वांशी ठेवा तुम्ही सद्भावना मनात
हा भेदभाव तुम्ही करु नका आपसात - ।।

अल्लाह , ईश्वर एक विश्वाचा जो निर्माता
तो तारणार आहे, सर्वांचा आहे तो दाता
भक्ती करुन त्याची पावन व्हा जीवनात
हा भेदभाव तुम्ही करु नका आपसात - ।।

अतिरेक शिकवणार हा धर्माचा नाही पंथ
अल्लाह च्या आदेशाने होणार त्याचा अंत
कुरआन चा हा उपदेश ठेवा तुम्ही ध्यानात
हा भेदभाव तुम्ही करु नका आपसात -।।


**सय्यद गालीब फरीद (हमदर्द)**
कारागीर ब परळी औ.वि.केंद्र


